International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 15 January – February - 2026

# महाराष्ट्रातील कोकणा व कोळी महादेव जमातीचा सामाजिक व आर्थिक अभ्यास

**तुषार रमेश महाले[१], डॉ. मोहन भिमराव कांबळे[२]**

*[१]संशोधक विद्यार्थी, मराठा विद्या प्रसारक समाजाचे के. आर. टी. आर्ट्स, बी. एच. कॉमर्स ॲण्ड ए. एम. सायन्स कॉलेज, नाशिक (के. टी. एच. एम. कॉलेज)*

*[२]संशोधक मार्गदर्शक, मराठा विद्या प्रसारक समाजाचे कर्मवीर शांताराम कोंडाजी वावरे कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, उत्तमनगर, सिडको, नाशिक*

*Corresponding Author – तुषार रमेश महाले*

**DOI - 10.5281/zenodo.18861418**

**प्रस्तावना:**

नागर संस्कृतीपासून दूर व अलिप्त राहिलेले संबंधित प्रदेशातील मुळचे रहिवासी म्हणजे आदिवासी, असे सामान्यपणे म्हणता येईल. सर्वसाधारणपणे जंगलात, दुर्गम दऱ्याखोऱ्यांत व सुसंस्कृत समाजापासून तुटक असलेल्या प्रदेशात ते तुरळक वस्ती करून राहतात. नागर संस्कृतीचा त्याप्रमाणे वर्गश्रेणीबद्ध समाजाचा संपर्क न झालेल्या वैशिष्ट्यपूर्ण चालीरीती किंवा ‘संस्कृती’ आदिवासींत आढळतात. अर्थात जगातील सर्व आदिवासी त्या त्या प्रदेशातील मूळ रहिवासी आहेतच, असे ठामपणे म्हणता येत नाही. परंतु दुसऱ्या सर्वमान्य संज्ञेच्या अभावी आदिम संस्कृतीची दर्शक अशी आदिवासी हीच संज्ञा रूढ झाली आहे. अनेक नागर संस्कृतींचे उदयास्त झाले, परंतु त्यांच्याशी संपर्क न साधल्यामुळे किंवा न आल्यामुळे आदिवासी जमाती जशाच्या तशाच राहिल्या. त्यांच्यात हजारो वर्षे विशेष परिवर्तन झाले नाही. 2011च्या जनगणनेनुसार देशातील एकुण लोकसंख्येत आदिवासी जमातीचे प्रमाण 8.6 % असून त्यांच्या 557 जमाती आहेत. देशातील अर्ध्यापेक्षा अधिक आदिवासी लोकसंख्या मध्यप्रदेश, छत्तीसगड, महाराष्ट्र, ओडिसा, झारखंड आणि गुजरात या राज्यामध्ये आढळते. महाराष्ट्रात आदिवासींचे एकुण लोकसंख्येतील प्रमाण सन 2011 मध्ये 9.35% होते. राज्यात एकूण 47 आदिवासी जमाती असून कोकणा, महादेव कोळी, भिल्ल, गोंड, ठाकूर, वारली या प्रमुख आदिवासी जमाती आहेत.

कोकणा जमात कोकणी, कुकणी या नावांनीही ओळखली जाते. या जमातीच्या नावावरून त्यांचे मुळस्थान कोकण असावे. यासंदर्भात अनेक संशोधकांनी आपली मते व्यक्त केली आहेत. आदिवासी संशोधक आणि अभ्यासक डॉ. गोविंद गारे यांच्या मते 'कोकणा' हा शब्द 'कोकण' या शब्दापासून आला असून तेच या जमातीचे मूळवस्तीस्थान आहे. कोकणा जमातीतील संशोधक प्रा. ए. बी. देशमुख यांनी या जमातीवर संशोधनात्मक लेखन केले आहे. त्यांनी कोकणा जमातीचा सबंध प्राचीन काळातील नाग जमाती सोबत जोडला आहे. त्यांच्या मते 'कुंकण' हा नागांचा एक पराक्रमी राजा होता त्याच्या नावावरून या प्रदेशाला 'कोकण' हे नाव पडले आणि या प्रदेशात वास्तव्य करणारे लोक 'कोकणी' म्हणून ओळखले जावू लागले. ऐन्थोव्हेन आणि काही स्थानिक अभ्यासकांच्या मते 1396 ते 1408 आणि पुन्हा 1468 ते 1475 या दरम्यान पडलेल्या दुर्गादेवीच्या भयंकर दुष्काळात या जमातीच्या लोकांनी कोकणातून स्थलांतर केले. या दाखल्यांवरून कोकणा जमातीला प्राचीन इतिहास असून देशाच्या अनेक भागात त्यांचे स्थलांतर झाले

असल्याचे स्पष्ट होते. महाराष्ट्रात ठाणे, धुळे, नाशिक आणि नंदुरबार जिल्ह्यामध्ये कोकणा जमातीचे वास्तव्य आहे. राज्यात सर्वाधिक कोकणा जमातीची लोकसंख्या ही नाशिक जिल्ह्यात आहे. नाशिक जिल्ह्यातील सुरगाणा, पेठ, इगतपुरी, दिंडोरी आणि त्र्यंबकेश्वर या तालुक्यात कोकणा जमात आढळते. 2001 च्या जनगणनेनुसार कोकणा जमातीची महाराष्ट्रातील लोकसंख्या 5,71,916 इतकी होती ती महाराष्ट्राच्या 6.66 % होती. तसेच 2011 च्या जनगणनेनुसार राज्यात कोकणा आदिवासींचे लोकसंख्या 6,87,431 असून एकूण आदिवासींमध्ये कोकणा जमातीचे प्रमाण 6.54 % होते.

कोळी महादेव समाजाची लोकसंख्या 2011 च्या जणगणने नुसार संपूर्ण महाराष्ट्रात 14,59,565 आहे. नाशिक जिल्हयात 5,05,667 इतकी आहे. महादेव कोळी मुख्यतः पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्ह्यातील पश्चिम पट्ट्यातील डोंगराळ भागात आणि ठाणे व रायगड (कुलाबा) जिल्ह्यात सह्याद्रीच्या घाटपायथ्याला पर्वतरांगांच्या उतारावर राहतात. उंच डोंगराच्या कुशीत वसलेल्या लहान लहान गावांमधून त्यांची वस्ती विखुरलेली आहे. त्यांची कित्येक गांवे समुद्रसपाटीपासून 1000 ते 4000 फूट उंचीवर असलेल्या पर्वतकड्यांच्या निर्जन अंतर्भागात वसलेली आहेत. पुणे, अहमदनगर आणि नाशिक जिल्ह्यांचे पश्चिम पट्टे (स्थानिक भागांत त्यांना अनुक्रमे मावळ, नहेर, डांगण व कोकण असे म्हणतात.) सह्याद्रीच्या पूर्वेला दक्षिणोत्तर 300 ते 400 मैल लांब व 40 ते 50 मैल रुंद असे विस्तारलेले आहेत. पुणे जिल्ह्याच्या आग्नेयकडील मुसा खोरे व उत्तरेस नाशिक जिल्ह्यातील त्र्यंबकेश्वर व वणीपर्यंतचे क्षेत्र अशा सुमारे 2,500 चौ. मैलांच्या भूप्रदेशात महादेव कोळी जमातीची वस्ती आढळते. या विशिष्ट प्रदेशाला 'कोळवन' असे म्हणत. (कोळ = कोळी, वन = जंगल प्रदेश) हेच महादेव कोळी जमातीचे मूळ वस्तीस्थान होय. या भूप्रदेशात सह्याद्री पर्वतरागांतील उंच गिरिशिखरे आढळून येतात. उदा. भीमाशंकर, हरिश्चंद्रगड, रतनगड, कळसूबाई, त्र्यंबकेश्वर ही शिखरे महादेव कोळी जमातीच्या देवतांची पवित्र ठिकाणे मानली जातात. ऐतिहासिक दप्तरात सर्व कोळी गटांची 'कोळी' या एकाच सदराखाली नोंद झालेली आहे. वस्तुतः महादेव कोळी हे सामाजिक, सांस्कृतिक व वांशिकदृष्ट्या वेगळे आहेत. त्यांच्यात व इतर कोळ्यांत बेटीव्यवहार होत नाही. त्यांची क्षेत्रही भौगोलिकदृष्ट्या अलग अलग आहेत व त्यांचे व्यवसायही भिन्न आहेत. त्यांची कुळे, गणगोत्र आणि सामाजिक रीतिरिवाजाच्या पद्धतीही भिन्न आहेत.

**संशोधनाची उद्दिष्ट्ये:**

1. महाराष्ट्रातील कोकणा जमातीच्या सामाजिक व आर्थिक जीवनाचा अभ्यास करणे.
2. महाराष्ट्रातील कोळी महादेव जमातीचा सामाजिक व आर्थिक स्थितीचा मागोवा घेणे.

**संशोधन पद्धती:**

प्रस्तुत संशोधनासाठी दुय्यम तथ्य सामग्रीचा आढावा घेण्यात आला आहे. यामध्ये भारत सरकारच्या अधिकृत संकेतस्थळांबरोबरच संदर्भ ग्रंथ, संशोधन प्रबंध तसेच संशोधन निबंध यांचा अभ्यास करण्यात आला आहे.

**कोकणा जमातीची सामाजिक व आर्थिक परिस्थिती:**

**अ) कोकणा जमातीची सामाजिक परिस्थिती:**

**1) कुटुंबव्यवस्था:** कोकणा समाजाचे कुटुंब पितृसत्ताक पद्धतीचे आहे. कुटुंबाचे सगळे कारभार कुटुंबप्रमुख पुरुषाच्या नावानेच होतात. कुटुंब प्रमुख पित्याचेच आडनाव सगळ्या कुटुंबियांना घ्यावे लागते. आडनावाला ते 'कुळ' म्हणतात. कुटुंबात नवरा-बायको, त्यांची मुले आणि नवऱ्याचे आई-वडील इत्यादी माणसांचा समावेश होतो. कुटुंबाचे हे प्राथमिक सदस्य आहेत. कोकणांमध्ये संयुक्त कुटुंबाचे प्रमाण कमी आहे. लग्न झाल्यानंतर काही महिन्यांनी किंवा वर्षांनी मुलांचा

कल स्वतंत्र राहण्याकडे असतो. वाद-विवाद टाळून वडिलोपार्जित मालमत्ता सर्व भावांमध्ये समान विभागून देतात. कुटुंबप्रमुख गावच्या पंचमंडळींना सोबत घेऊन मालमत्तेची वाटणी करतात. मालमत्तेमध्ये शेतजमीन, घर, बैल, गाई, शेळ्या, इतर शेतीची अवजारे, भांडी-कुंडी, सरपणाची लाकडे या सगळ्या वस्तूंची समान वाटणीही सगळ्या भावांमध्ये केल्यानंतर विभक्त कुटुंब अस्तित्वात येते. कुटुंबपद्धती कोणतीही असो; कुटुंबप्रमुख मात्र पुरुषच असतो.

**2) नातेसंबंध:** कोकणा समाजात विविध नाती-गोती असून त्यांची वीण भक्कम आहे. नातेसंबंधाचे नियमन पारंपरिक आणि सामाजिक पध्दतीने करण्याकडे कोकणांचा कल असतो. दोन विशिष्ट व्यक्तींमधील नात्याचे 'संबोधन' सभोवतालच्या मुख्य समाजाच्या नातेसंबोधनाप्रमाणेच असल्याचे दिसून येते. कोकणा समाजाची नातेव्यवस्था अतिशय सुदृढ आहे. काही आप्तसंबंधात परस्परांशी वागताना विशेष उच्च दर्जा दिलेला असतो. कोकणा आदिवासींची नातेव्यवस्था आणि आप्तसंबंध हजारो वर्षाच्या रुढ झालेल्या रचनेवर घट्ट राहिलेले आहेत. आदर्श नातेव्यवस्थेमुळेच कोकणा आदिवासी सामाजिकदृष्ट्या संघटित आणि स्थिर राहिला आहे.

**3) बोलीभाषा:** कोकणांची पूर्वी भाषा कोकणी होती असे म्हटले जाते. सध्या बहुतेक जन हे इतर लोकांप्रमाणे मराठी भाषा बोलतात. कोकणी लोकांची भाषा ही रत्नागिरी आणि गोव्याच्या किनारी भागात बोलल्या जाणाऱ्या कोकणी भाषेपेक्षा वेगळी आहे. जुन्या पिढीतील लोक हे आपापसात कोकणी आणि बाहेरच्या लोकांशी मराठीत बोलतात. आज नाशिक, धुळे, नंदुरबार आणि ठाणे जिल्ह्यात कोकणा लोक जी 'कोकणी' बोलीभाषा बोलतात ती देखील स्थलपरत्वे लवचिक झालेली दिसते; परंतु मूळ स्रोत एकच आहे. कोकणी बोली ही महाराष्ट्रात मराठीला जवळची आहे. तर गुजरातमध्ये गुजरातीशी मात्र गुजरातेतील डांग जिल्ह्यात डांगी गुजराती बोलली जाते. त्या डांगी वळणाच्या बोलीभाषेचा सुरगाणा आणि कळवण, बागलाण, साक्रीच्या पश्चिम हद्दीवरील कोकणी बोलीवर बराचसा प्रभाव पडलेला दिसतो.

**4) शिक्षण:** कोकणा जमातींच्या गावात शाळा असूनही शाळेत जाणा-या वयोगटातील मोठ्या संख्येने मुले शाळेत जात नाहीत. कौटुंबिक उत्पन्नाची पूर्तता करण्यासाठी या मुलांना एकतर घराची देखभाल करावी लागते किंवा बाहेरील कामात भाग घ्यावा लागतो. जर कोकणा जमातीत एकुलता एक मुलगा असेल, तर त्याने आपला पारंपरिक व्यवसाय करावा अशी त्याची अपेक्षा असते. जर त्याला अधिक मुलगे असतील तर त्यापैकी काही शाळेत गेले तर त्याला हरकत नाही, परंतु तो त्यांना जास्त काळ सोडू शकत नाही. तो कबूल करतो की शिक्षण ही एक मोठी संपत्ती आहे, परंतु परिस्थिती त्याला भविष्यापेक्षा वर्तमानाची अधिक काळजी घेण्यास भाग पाडते.

**5) जीवन चक्र:**

**जन्म**: कोकणा जमातीत बाळाचा जन्म ही सर्वसाधारण घटना असली तरी या घटनेचे सामाजिक-सांस्कृतिक वेगळेपण आहे. राहत्या घरीच स्त्रीचे बाळंतपण, गाव-पाड्यावरील बाळंतपण करण्याचे कौशल्य आत्मसात केलेल्या बाईकडून केले जाते. बाळंतपण करणाऱ्या दायीस 'सुईण' अथवा 'सोयरीण' म्हटले जाते. बाळंतपणाच्या पहिल्या पाच दिवस बाळ-बाळंतिणीची काळजी घेण्याची जबाबदारी सुईणची असते. बाळाच्या जन्मानंतर विळयाने अथवा चाकूने नाळ कापून पाच प्रकारच्या धान्यात घालून घरात अथवा गोठ्यात खड्डा करुन पुरुन देतात. त्यावर सपाट दगड ठेवतात. या दगडावर बसूनच बाळ बाळंतणीला दररोज अंघोळ घातली जाते. पाचव्या दिवशी 'पाचवी' म्हणजे धानी-सटवाईची पूजा केली जाते.

**विवाह**: विवाह हा कोकणांच्या आयुष्यातील महत्त्वाचा टप्पा असतो. तरुण-तरुणी विवाह योग्य वयाचे झाल्यावर पालक स्थळ शोधण्याच्या दृष्टीने हालचाली सुरु करतात. मुलीचा विवाह साधारणतः 15 ते 18 वर्षे आणि मुलांचा विवाह 16 ते 21 वर्षे या वयोगटात योग्य मानला जातो. मुलीच्या पालकांनी

विवाहास होकार दिल्यानंतर 'कुंकू मागणी' किंवा 'पेन भरणे' हा सोहळा केला जातो. विवाह सोहळ्याप्रसंगी देव खेळविणे, तेल जाळणे, मांडव घालणे, हळदी कार्यक्रम आणि लग्न लावणे यांसारखे विधी केले जातात. वाजंत्री आणि बायकांची पारंपरिक गाणी यांमुळे कोकणांचा विवाह प्रसंग उच्च सांस्कृतिक सामूहिक ठेवा असल्याचे दिसून येते. दोन्हीकडील वऱ्हाडी मंडळीस सस्नेह भोजन दिले जाते. शेवटी वधू-वरांची बाळशिंगे उतरवून लग्नसोहळा पूर्ण केला जातो.

**मृत्यू** : कोकणा जमातीत मृत शरीराला 'अग्नि संस्कार' व 'दफन' विधी करणे या दोन्ही प्रथा अस्तित्वात आहेत. मृत शवाला स्नान घातल्यानंतर हळद लावून तिरडीवरून स्मशानात नेतात. स्त्रियांना स्मशानाच्या ठिकाणी उपस्थित राहण्यास मनाई असल्याने त्यांना अर्ध्या वाटेवरून परत जावे लागते. अशा जागेला 'विसावा' असे म्हणतात. स्मशानात जमा झालेले लोक नदी नाल्यावर स्नान करून येतात. त्यांनंतर मुलगा किंवा जवळचा नातेवाईक चितेला अग्नी देतो, अथवा दफनही केले जाते.

**6) देवदेवता:** कोकणा-कोकणी आदिवासी समाज निसर्गपूजक असल्यामुळे त्यांची दैवते आणि श्रद्धास्थाने सुध्दा नैसर्गिक आणि अनाकलनीय, कल्पित अशीच आहेत कोकणांचे देव हे दोन प्रकारांमध्ये आहेत. ते म्हणजे प्रकृती देवता आणि अन्नदेवता. प्रकृती देवतांमध्ये मुख्यतः **वाघदेव, नागदेव, पानदेव आणि डोंगरदेव** तर अन्नदेवतेमध्ये **कणसरी मावली, रास** या होत. त्याचप्रमाणे अग्नी, जल, वायू, धरती व आकाश या पाच तत्त्वांनाही ते देव मानतात. त्यांनी जंगली हिंस्त्र प्राण्यांमध्ये वाघाला देवत्व **(वाघ देवता)** बहाल केले. सरपटणाऱ्या प्राण्यांमध्ये नागाला देवत्व **(नाग देवता)** दिले. नागाचा संबंध ते आपल्या मूळ वंशाशीही लावतात. पाळीव प्राण्यांमध्ये गाईला ते कृषीलक्ष्मीच मानतात. पिकांमध्ये 'नाचणी'ला ते **'कणसरीमाता'** तर धान्यांमध्ये नाचणीच्या दाण्यांना 'रास' किंवा 'धनलक्ष्मी' मानतात. निसर्गात घडणाऱ्या घटना जसे वीज कडाडणे, वादळ-वारा, पाऊस पडणे, आकाशातील ढग (ढेगू-मेघू), चंद्र, सूर्य या सर्वांना ते देव मानतात. परंतु सांस्कृतिकदृष्ट्या कोकणींच्या देवांचा राजा म्हणजे 'डोंगरी देव' आहे.

**ब) कोकणा जमातीची आर्थिक परिस्थिती:**

**1) शेती:** कोकणा-कोकणी आदिवासींचे उपजीविकेचे मुख्य साधन शेती आहे. असे असले तरी या जमातीत भूमिहीन कुटुंबांचे प्रमाण 40% एवढे आहे. याचाच अर्थ ही भूमिहीन कुटुंबे शेतमजुरी, हंगामी स्वरूपाची अन्य कामे किंवा मजुरी, पशुपालन, कारागिरी, शेतीच्या संबंधित इतर व्यवसायांवर आपली उपजीविका करतात. साधारणतः 60% कोकणा कुटुंबांकडे स्वतःची जमीन आहे; परंतु या मालकीच्या जमिनीचे सरासरी प्रमाण दर कुटुंबाला 3.39 एकर एवढे असून प्रत्यक्ष लागवडीलायक जमिनीचे क्षेत्र मात्र दर कुटुंबाला 3.1 एकर असल्याचे एका पाहणीत आढळून आले. जमीन धारणेचे हे प्रमाण लक्षात घेता कोकणा शेतकरी हा अल्पभूधारक आहे. या जमातीचा मुख्य व्यवसाय शेती असला तरी शेती हे लोक अतिशय पारंपरिक पद्धतीने करतात.

**2) पिके आणि पिकपद्धती:** आदिवासी कोकणपट्टीत मुख्यतः नागली, भात, गहू, ज्वारी आणि बाजरी ही धान्यपिके घेतली जातात तर उडीद, मूठ, मूग, चवळी ही कडधान्ये आणि भूईमूग, सूर्यफूल, तीळ, खुराचणी (कारळा) ही तेलबिया पिके घेतली जातात. ही सगळी पिके हंगामात पावसाच्या पाण्यावर घेतली जातात तर अलीकडे कांदा, कोबी, टोमॅटो, मिरची यासह काही पालेभाज्याही पिकविल्या जातात. या व्यापारी पद्धतीच्या पिकांमधून आदिवासी शेतकऱ्यांना दोन पैसेही मिळू लागल्याचे चित्र दिसते. परंतु ही पिकपद्धती सिंचन समस्या आणि बाजारपेठेचा अभाव, दळणवळणाच्या अपुऱ्या सोयींमुळे अजूनही कायमस्वरूपी स्थापित होऊ शकली नाही.

**3) अन्नसंचय व पशुपालन:** कोकणा-कोकणी आदिवासींमध्ये बदलत्या अर्थव्यवस्थेच्या वैशिष्ट्यांमुळे अन्नसंचय आणि पशुपालनसारख्या प्राथमिक स्वरूपाच्या

आर्थिक क्रियांचे प्रमाण अतिशय अल्प आहे. कंदमुळे, फळे, मध, डिंक आणि वनउत्पादने गोळा करून त्यांचा संचय करणे, शिकार, मासेमारी हे आदिम समाजाचे अगदी प्राथमिक अवस्थेतील आर्थिक वैशिष्ट्य होते. अन्नसंचयाबरोबरच पशुपालन ही क्रिया आदिवासींमध्ये दिसून येते. या समाजांनी पशुपालनासारख्या क्रियेकडे आपले लक्ष वळविले. प्राण्यांचे पालन जर केले तर त्यांच्यापासून दूध, मांस हे अन्न मिळेल त्याचप्रमाणे वाहतुकीसाठी आणि शेतीविषयक क्रियांसाठी ह्या प्राण्यांचा उपयोग करून घेता येऊ लागला. कोकणा समाज मुख्यतः गाई, बैल, म्हशी, शेळ्या असे प्राणी पाळू लागला.

**4) हस्तव्यवसाय आणि मोलमजुरी:** कोकणा समाजामध्ये काही लोक लाकूडकाम, बांबूकाम, टोपल्या तयार करणे, घरगुती वापराच्या वस्तू तयार करणे त्याचबरोबर शेतीची अवजारे बनविणे इत्यादी व्यवसाय या लोकांनी स्वीकारलेत. बाजारपेठेच्या अभावामुळे आणि आदिवासींच्या उपयोगमूलक दृष्टिकोनामुळे त्यांना आर्थिक फायदा असा काही झालेला नाही किंवा होत नाही. कोकणा-कोकणी आदिवासींमध्ये मोलमजुरी करणाऱ्या लोकांचे प्रमाणही लक्षणीय आहे. यात शेतीवर मोलमजुरी करणारे आणि अलीकडे आदिवासी भागात निर्माण झालेली काही लहान-मोठी सरकारी कामे, धरणे बांधणे, लघुउद्योग, साखर कारखाने, ठेकेदार या मंडळींकडे मोलमजुरी करण्यासाठी आदिवासी जात असतात. मोलमजुरीच्या या व्यवसायात आदिवासींची पिळवणूक स्पष्टपणे दिसून येते.

**कोळी महादेव जमातीची सामाजिक व आर्थिक परिस्थिती:**

**अ) कोळी महादेव जमातीची सामाजिक परिस्थिती:**

**1) पोशाख**: महादेव कोळी पुरुष अंगात बंडी, पेहरन किंवा सदरा अथवा कोपरी घालतो व कमरेला चार हात धोतर, विजार अथवा लंगोटी नेसतो. स्त्रिया नऊवार लुगडी, चोळ्या वापरतात. लुगडे कमरेभोवती घट्ट परंतु गुडघ्यापर्यंत नेसतात. काळ्या मण्याच्या पेशापोतीत सोन्या-चांदीचा एखादा दुसरा मणी स्त्रीच्या गळयात दिसतो. दागिन्यांची हौस स्त्रियांना तितकीशी दिसत नाही. प्रसंगी नऊवार लुगड्याचे दोन लुगडीही त्या करतात.दागिन्यांमध्ये कानांत बाळ्या, बुगड्या, कुड्या, कर्णफुले तर नाकात नथ, मोरणी, हातात पाटल्या, तोलबंदी, गोठ, वेळा, गळयात साखळी, हसली, बोटात अंगठी, पायाच्या बोटात जोडवी, मासळी इत्यादी दागिने स्त्रिया ऐपतीप्रमाणे वापरतात. स्त्रियांना गोंदण्याची हौस आहे. कपाळावर, गालावर व हनुवटीवरही त्या गोंदवून घेतात.

**2) देव- देवता:** महादेव कोळी जमातीत देवांची आणि भूतपिशाचांची प्रतिष्ठापना ओबडधोबड दगडाला शेंदूर फासून केलेली असते. या देवांची उपासना वर्षातून एकदा किंवा दोनदा करण्यात येते. मुख्यतः चार प्रसंगी अशा देवांची आराधना करण्यात येते. 'बाराई' म्हणजे बालकाचा जन्म झाल्यावर बाराव्या दिवशी करावयाचा समारंभ, 'रास' म्हणजे सुगीच्या हंगामात करावयाचा समारंभ. मळणी केलेले भात खळयात गोळा करून त्याची रास करतात व त्याची राखण करण्यासाठी हा समारंभ करण्यात येतो. चैत्राच्या शुक्लपक्षात 'पांजी' चा समारंभ साजरा करतात. यावेळी देवांची पूजा करून काळ्या बोकडाचा किंवा मेंढराचा बळी देण्यात येतो. चवथा आणि शेवटचा समारंभ म्हणजे 'सटी' हा जनावरांचा उत्सव होय. धार्मिक बाबतीत 'भगत' हा त्यांचा पुढारी मानला जातो. तो धार्मिक विधींचा प्रमुख असतो. महादेव कोळी जमातीत पूर्वजांची उपासना करण्याची चाल आहे.

**3) जीवन चक्र:**

**जन्म:** मूल जन्मानंतर पाचव्या दिवशी सटवीच्या स्मरणार्थ पाचवीचा पाट पुजून जेवण घालतात. मुलाचे भवितव्य सटवी त्याच्या कपाळी पाचव्या दिवशी लिहिते. जन्मापासून बारा दिवस मुलाचे संरक्षण 'बाराबळी' करतात. बाराव्या दिवशी 'बाराबळी' मोडण्याचा कार्यक्रम होतो.

**विवाह:** विवाहाला या जमातीत महत्वाचे स्थान आहे. वयात आल्यावर मुलामुलींची लग्ने करतात. पूर्वी बालविवाह रूढ होता. मुलगी पाहून सोयरिक जमविण्यात येते. मुलीच्या साखरपुड्यास कुंकू तर लग्नाच्या देण्या-घेण्यास 'देज' म्हणतात. साखरपुड्यास कुंकू लावणे असेही म्हणतात. यावेळी गांवातील प्रमुखाना बोलावण्यात येते. लग्न नवरी मुलीच्या घरी डहाळ्यांचा मांडव टाकून केले जाते. लग्नामध्ये स्त्रिया गाणी म्हणतात. पूर्वी 3/4 दिवस लग्न समारंभ चालत असे.

**मृत्यू:** मृत्यूनंतर मृतात्म्याला त्रास होऊ नये म्हणून पुरण्यात येते. मृत्यूनंतर दहा दिवस सुतक पाळून दहाव्या दिवशी दशक्रिया विधी घालतात. नातेवाईक, सोयरे पागोटे बांधून 'ओला दुखवटा' तर दूरचे लोक रोख रक्कम देऊन 'सुका दुखवटा' करतात. दशक्रियेच्या दिवशी सारा समाज एकत्र येत असल्याने 'जातपंचायत' सामाजिक न्याय निवाडे करते.

**4) सण- उत्सव:** धार्मिक व लग्नकार्याचे विधी पाटलाच्या अनुमतीनेच केले जातात. शेतीच्या हंगामानुसार सणाबरोबरच, गावदेवाची जत्रा, दिवाळी, दसरा, शिमगा इत्यादी सण साजरे करतात. सणासुदीला, लग्नविधी प्रसंगी व सामाजिक धार्मिक समारंभाच्या वेळी सामूहिक नृत्य आणि गाण्याचे व करमणुकीचे कार्यक्रम होतात. चैत्र महिन्यांत महादेव कोळी बोहडा सादर करतात. हा कार्यक्रम देवीच्या स्तुतीसाठी तीन दिवस चालतो. बोहड्यांत ग्रामदेवतांची, पौराणिक कथांची सोंगे नाचविली जातात. इतर करमणुकीच्या प्रकारांत डुकराची शिकार, घोडा नृत्य, टिपरी, लेझिम हे प्रकार प्रचलित आहेत. या जमातीत तमाशाची मोठी आवड आहे. प्रत्येक गावात तमाशाचा छोटा मोठा फड असतो. 'डाका-भगत' हा वैशिष्ट्यपूर्ण देवकार्याचा प्रकार या जमातीत प्रचलित आहे.

**5) न्यायदान पद्धती:** पंच मंडळी जमातीचा कारभार पाहतात. जमातीच्या सामाजिक प्रतिष्ठेचे संरक्षण करणे व समाजविरोधी कृत्ये करणाऱ्या लोकांमुळे जमातीला कमीपणा येणार नाही याची खबरदारी घेणे ही पंच मंडळींची मुख्य जबाबदारी असते. पंच मंडळी समाजकंटकांच्या सर्व हालचालींवर लक्ष ठेवतात आणि आवश्यकता वाटल्यास गुन्हेगाराला शिक्षा ठोठावतात. पंचमंडळी समाजातील भांडणे सामोपचाराने मिटवतात. समझोता झाला नाही तर जो पक्ष दोषी असेल त्या पक्षाला शिक्षा करण्यात येते. लोकांचे तंटे न्यायदान मिटवण्यासाठी महादेव कोळी जमातीत पूर्वी 'गोतरणी' नांवाची 'गोतसभा' असे. नैतिक व सामाजिक नियमांचे भंग करणाऱ्या लोकांना तिच्यामार्फत शिक्षा करण्यात येत असे.

**ब) कोळी महादेव जमातीची आर्थिक परिस्थिती**

**1) शेती:** महादेव कोळी जमातीचा मुख्य व्यवसाय शेती व शेतमजुरीचा आहे. शेती जुन्याच पद्धतीने व तुटपुंज्या साधनसामग्रीवर केली जाते. त्यांच्या जमिनी माळरानाच्या व निकस असतात. त्यामुळे शेतीतून उदरनिर्वाहाला पुरेसे उत्पन्नही त्यांना मिळत नाही. जनावरे पाळणे, जंगलची कामे करणे, हिरडा, बेहडा, मोहटी व जंगल फळे गोळा करून विकणे हे त्यांचे दुय्यम व्यवसाय होत. या समाजातील अनेक कुटुंबे दैन्यावस्थेत व दरिद्री जीवन जगताना दिसतात. डोंगराळ भागातील निकृष्ट शेतीमुळे या समाजात उर्जितावस्था अभावानेच आढळते. जोडधंदे व इतर व्यवसाय वर्षभर पुरणारे नसतात.

**2) वन संपत्ती व जंगलावरील आधारित व्यवसाय:** महादेव कोळी जमात ही प्रामुख्याने डोंगरी भागात मोठ्या प्रमाणात आढळते. जंगलामधील मध, लाख, झाडांची फळे, रानभाजी, बांबू आणि औषधी वनस्पती गोळा करतात आणि जवळील बाजार पेठे मध्ये त्याची विक्री करतात हा त्याच्या उपजीविकेचा महत्त्वाचा भाग आहे. तसेच इंधनासाठी जळावू लाकूड जंगलातून गोळा करून ते स्वत:साठी वापरतात व उरलेल्या लाकडाची विक्री करतात.

**3) मजुरी आणि श्रमकेंद्रित कामे:** महादेव कोळी जमातीतील लोक हे शेतीचा हंगाम पूर्ण झाल्यावर ते स्थानिक पातळीवर किंवा शहरांमध्ये मजुरी करतात. त्याचबरोबर रस्ते

बांधणी, वीटभट्टी, बांधकाम इत्यादी क्षेत्रांमध्ये मजुरी करतांना आढळतात. महादेव कोळी जमातीमधील बरेच शेतकरी हे भूमिहीन असल्यामुळे ते अन्य शेतकऱ्यांकडे मजूर म्हणून काम करतात. जंगलतोड, वाहतूक, रस्ताबांधणी, पूलबांधणी या कामाकरीता आदिवासींना अकुशल कामगार म्हणून घेतले जाते. आज औद्योगिक क्षेत्र प्रमुख आर्थिक केंद्र झालेले आहे. त्याचा स्पर्श आज आदिवासी जीवनाला देखील झालेला पहायला मिळतो. आज औद्योगिक क्षेत्रांत आदिवासी मजूर म्हणून काम करतांना दिसत आहेत.

**4) पशुपालन:** खाद्यसंकलनाची आर्थिक क्रिया मानवाला स्थैर्य देऊ शकली नाही. जीवननिर्वाहाची ही पहिली अवस्था होती. खाद्यसंकलन करता करता आपल्याला खाद्यउत्पादनही करता येते, याचा शोध त्याला लागला. पशुपालन व शेती या दोन आर्थिक क्रिया याची उदाहरणे आहेत. महादेव कोळी जमातीतील लोक हे शेतीसोबतच गायी, म्हशी, बकऱ्या आणि कोबड्या पळतांना दिसत आहेत. प्राण्यांचे दुध, केस, कातडे आणि मास मिळवण्यासाठी पशुपालन केले जाते आहे.

**5) हस्तव्यवसाय:** महादेव कोळी जमातीतील बहुसंख्य लोक हे पूरक किंवा दुय्यम व्यवसाय करत असल्याचे चित्र दिसते. टोपल्या तयार करणे, मडकी तयार करणे, सूत कातणे, विणणे, दोर वळणे, घरगुती वापराला उपयुक्त असणाऱ्या वस्तू तयार करणे, चटूया तयार करणे इत्यादी हस्तव्यवसाय तयार करीत असतात. तसेच जंगली पदार्थांपासून मद्य तयार करणे. धातुकाम, बांबूचे काम, मातीची भांडी, सुतार काम , संगीत वाद्ये तयार करणे . त्यापासून त्यांना बऱ्यापैकी उत्पन्न मिळते.

**समारोप:**

कोकणा व कोळी महादेव जमातींचा इतिहास, त्यांच्या परंपरा आणि त्यांच्या जीवनशैलीत अनेक आव्हानांचा समावेश आहे. या जमातींच्या सामाजिक जीवनात एकता, सहकार्य आणि सामूहिकता यांचा महत्त्वपूर्ण ठसा आहे. तथापि, आर्थिक दृष्ट्या, त्यांना अनेक समस्यांचा सामना करावा लागतो. त्यांच्या जीवनशैलीत बदल, शिक्षणाची कमी, रोजगाराची अनुपलब्धता यामुळे त्यांच्या विकासात अडथळे येतात.शिक्षणाच्या क्षेत्रात सुधारणा, कौशल्य विकास कार्यक्रम आणि स्थानिक संसाधनांचा योग्य वापर यामुळे या जमाती अधिक सक्षम बनू शकतात. सरकार व स्वयंसेवी संस्थांनी या समुदायांच्या विकासासाठी विविध योजना राबविल्या पाहिजेत. कोकणा व कोळी महादेव जमातींच्या सामाजिक व आर्थिक विकासासाठी एकात्मिक दृष्टिकोन आवश्यक आहे. त्यांच्या गरजा आणि समस्यांचा विचार करून योग्य धोरणे तयार केली पाहिजेत. यामुळे केवळ या जमाती नव्हे तर संपूर्ण समाजाचा विकास होईल. अखेर, या जमाती आपल्या सांस्कृतिक धरोहरासह आधुनिकतेचा स्वीकार करून एक समृद्ध भविष्य गाठू शकतात. त्यांच्या प्रगतीसाठी सर्व स्तरांवर सहकार्य आणि समर्थन आवश्यक आहे.

**संदर्भ:**


1. नाडगोंडे गुरुनाथ (1979), " भारतीय आदिवासी", कॉन्टिनेन्टल प्रकाशन विजयानगर पुणे.
2. कुलकर्णी शौनक (2009), "महाराष्ट्रातील आदिवासी", डायमंड प्रकाशन पुणे.
3. देशमुख बी. ए. (2006), " कोकणा- कोकणी इतिहास आणि जीवन", सुगावा पब्लिकेशन पुणे.
4. गारे गोविंद (2003), "सह्याद्रीतील आदिवासी: महादेव कोळी", श्रीविद्या प्रकाशन पुणे.
5. गारे गोविंद (2000), "महाराष्ट्रातील आदिवासी जमाती (सामाजिक व सांस्कृतिक मागोवा)", कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे.
6. जाधव सुधाकर (2012), "भारतातील आदिवासी समाज", चिन्मय प्रकाशन औरंगाबाद.
7. घायाळ .एस.पी.(2011), "आदिवासी समाजाचे समाजशास्त्र", अरूणा प्रकाशन लातूर.
8. http://www.censusindia.gov.in
9. https://tribal.maharashtra.gov.in